(3) Dr. Shivaji Diwan (Pol. sci)

Special Issue August 2019

# विद्यावार्ता®

Peer Reviewed International Refereed Research Journal

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
आणि
भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे

## खोलेश्वर महाविद्यालय, अंबाजोगाई

यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यशास्त्र विषया अंतर्गत
राष्ट्रीय चर्चासत्र

# मानवी अधिकार :
# सद्यस्थिती आणि आव्हाने



संपादक
डॉ.तात्या बाळकिसन पुरी

MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता™

Special Issue, August 2019

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

आणि

खोलेश्वर महाविद्यालय, अंबाजोगाई

यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यशास्त्र विषयाअंतर्गत

राष्ट्रीय चर्चासत्र

# मानवी अधिकार : सद्यस्थिती आणि आव्हाने

संपादक

डॉ.तात्या बाळकिसन पुरी

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat**.

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

13) केज मतदार संघातील महिला नेतृत्व : आमदार प्रा. सौ. संगिताताई ठोंबरे
**रेखा दौलतराव आलझेंडे, औरंगाबाद, डॉ. दिनकर तांदळे, अंबाजोगाई** ||56

14) मानव अधिकारांच्या संरक्षणासाठी यूनोचे योगदान
**प्रा.भाऊ दगडोबा आवटे, जालना** ||59

15) भारतीय शेती प्रश्न व मानवी हक्क
**प्रा.बागल जे. एस., बीड** ||61

16) भारतीय संविधानातील मानवी हक्क व उपाय
**बनसोडे गणेश बालासाहेब, डॉ. एन.बी. आघाव** ||63

17) आदिवासी आणि मानवी अधिकार
**प्रा.बिजयसिंग भावरदोडे, अंबाजोगाई** ||65

18) मानवी हक्क आणि देश-विदेशातील स्वयंसेवी संस्था
**प्रा. डॉ. भालेराव जे. के., प्रा. गव्हाणे राम, बीड** ||69

19) महिला आणि मानवी अधिकार
**प्रा.डॉ. प्रविण मुरलीधरराव भोसले, अंबाजोगाई** ||72

20) मानवी हक्क आणि स्त्री
**प्रा.सचिन राजाभाऊ डहाळे, परळी-वै., प्राचार्य डॉ. व्ही. जी. गुंडरे, अंबाजोगाई** ||74

21) दहशतवाद आणि मानवी अधिकार
**प्रा. रासवे दिनकर सुदामराव, उस्मानाबाद** ||75

22) महिला आणि मानवी अधिकार
**डॉ. मिना एम. वडगुळे, डॉ. बी. जी. देशमुख, कन्नड** ||77

23) महिला आणि मानवी अधिकार
**प्रा.डॉ. भाऊराव धोंडिबा मुंडे, बीड** ||80

24) बालकामगार, युवा, वृध्द आणि मानवी अधिकार
**प्रा.डॉ. शिवाजी गोविंदराव दिवाण, बीड** ||82

25) मानवी हक्क आणि महिला
**प्रा.डॉ. गित्ते आशा नरसिंगराव, मुखेड** ||85

www.vidyawarta.com/03 http://www.printingarea.blogspot.com

साधना मधून महिलांचे सबलीकरण साधण्याचा प्रयत्न दुसऱ्या महायुध्दानंतर अनेक राष्ट्रांमधून झाला . कायदा करुन महिलांना राजकीय आणि आर्थिक अधिकार बहाल करण्यात आले. कायदयाने महिला सबलीकरणाची प्रक्रिया सक्तीची बनविली. महाराष्ट्र शासनाचे महिला धोरण १९९४, २००१ तसेच महिलांसाठी आरक्षणाचा निर्णय २००० महाराष्ट्र शासनाचा कामाच्या ठिकाणी महिलांचा लैगिंक छळ प्रतिबंधक आदेश १९९८ इत्यादी तरतुदीमुळे स्त्रियांच्या संरक्षणाला आणि सबलीकरण प्रक्रियेला हातभार लागला आहे.

**७. प्रसारमाध्यमे:** महिला सबलीकरणाच्या प्रक्रियेमध्ये प्रसार माध्यमांचा साधन म्हणून वापर परिणामकारक ठरु शकतो. प्रसार माध्यमांचा वाढत्या जाळयाबरोबरच त्यांचा लोकांवर सकारात्मक आणि नकारात्मक परिणाम वाढतांना दिसत आहे. सबलीकरणाच्या प्रक्रियेत प्रसार माध्यमांचा योग्य वापर करुन घेण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. महिला सबलीकरणाच्या विषयातही समाजात जनजागृती निर्माण करण्यासाठी स्त्रियांविषयीच्या कल्याणकारी योजना स्त्री आरोग्य, शिक्षण, कुटूंब कल्याण या विषयी शासनाच्या योजना, धोरण लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी प्रसार माध्यमाचा वापर होतांना दिसतो. महिला सबलीकरणाविषयी महाराष्ट्र महिला धोरण १९९४ मध्ये विशेष नियमावली तयार करण्यात आलेली आहे.

**८. आरक्षण :** गेल्या दशकापासून आरक्षणाच्या साधनांचा महिला सबलीकरणासाठी अवलंब होताना दिसत आहे. महिलांना पुरुषांच्या बरोबरीने शिक्षणामध्ये आणि नोकऱ्यामध्ये समान संधी प्राप्त व्हावी त्यांना विकासाच्या संधी उपलब्ध व्हाव्यात. यासाठी काही क्षेत्रांमध्ये शिक्षण सरकारी नोकरी महिलासाठी जागा आरक्षित ठेवण्यात आल्या आहेत. भारतीय राज्य घटनेचेसर्वच क्षेत्रामध्ये स्त्री आणि पुरुषांना समान संधीची हमी दिली असली तरी हे तत्त्व प्रत्यक्षात आणणे अवघड असल्याचे निदर्शनास आले . परिणामी सकारात्मक कार्यामध्ये महिलांचा सहभाग वाढावा त्यांच्या सबलीकरणाला हातभार लागावा यासाठी जाणिवपूर्वक प्रयत्न आवश्यक होते त्यादृष्टिने महिला आरक्षणाची तरतूद केली गेली.

**संदर्भ ग्रंथ :**

१. समकालीन जागतिक राजकारण प्रमुख प्रश्न - शैलेंद्र देवळाणकर, विदया बुक्स पब्लिशर्स औरंगाबाद२००५
२. आंतरराष्ट्रीय प्रशासन - डॉ. पंचशिल एकंबेकर, डॉ.बालाजी कनुरवार प्रकाशक कनुरवार मारोती नायगाव जि. नांदेड
३. आंतरराष्ट्रीय संबंध - डॉ. वसंत रायचुरकर, मंगेश प्रकाशन, नागपूर
४. प्रतियोगिता दर्पण हिंदी मासिक मार्च २००८ मानवाधिकार वर्तमान समाज की आवश्यकता और भपंक वास्तव

24

# बालकामगार, युवा, वृध्द आणि मानवी अधिकार

**प्रा.डॉ. शिवाजी गोविंदराव दिवाण**
राज्यशास्त्र विभाग,
महिला महाविद्यालय, गेवराई
ता. गेवराई जि. बीड

**प्रस्तावना :-**

मानवी हक्कांची संकल्पना ही मानवाच्या अस्तीत्वाशी निगडीत आहे. मानवी हक्कांच्या संबंधीत जाणीव जागृती मध्ययुगीन काळात निर्माण झाली व हळुहळू मानवी हक्क या संकल्पनेची उत्क्रांती होत गेली. 'सेंट थॉमस ॲक्विनस' याला मानवी हक्कांचा जनक मानले जाते.

मानवी हक्क या संकल्पनेची व्याख्या विविध तज्ञांनी करण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतू एकच सर्वमान्य अशी व्याख्या उपलब्ध नाही.

**१. डार्किन :-** 'मानवी हक्क मानवाला प्राप्त झालेले असे हक्क असतात' ज्यांचे शासनाकडून उल्लंघन होऊ शकत नाही व राष्ट्रीय कायद्याशिवाय देखील ते उपभोगता येऊ शकतात.

**२. मानवी हक्क संरक्षण कायदा :-** मानवी हक्क हे नैसर्गिक स्वरुपाचे हक्क आहेत. हे नैसर्गिक हक्क सर्व व्यक्तींना जन्मतः प्राप्त होत असतात, असे प्रतिपादन प्राचीन ग्रीक स्टॉईक तत्वज्ञांनी केलेले आहे. यालाच नैसर्गिक हक्क सिध्दांत असे म्हणतात. थॉमस हॉब्ज, जॉन लॉक, जीन रूसो यासारख्या विचारवंतांनी सामाजिक करार सिध्दांताचा पुरस्कार केला. त्यांच्या मते राजसत्ता ही एक सामाजिक करारातून निर्माण झालेली असते. ज्याद्वारे राजा हा प्रजेच्या हक्कांचे संरक्षण करण्याची हमी देतो.

समाज जीवनात मानवी हक्कांना अनन्यसाधारण असे महत्व आहे. मानवी जीवनाचा विकास करण्यासाठी मानवी हक्कांची आवश्यकता असते. जगातील बहुतेक सर्व राष्ट्रांनी मानवी हक्काच्या या जाहिरनाम्याचा स्वीकार केलेला आहे. भारतात सन १९९३ मध्ये मानवी हक्क कायदा आणला गेला व मानवी हक्क सुरक्षीतता कायदा १९९४ नुसार भारतात राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाची स्थापना करण्यात

आली आहे. प्रत्येक व्यक्तीला जन्माबरोबरच जगण्याचा आणि वैयक्तिक संरक्षणाचा अधिकार आहे.

**१. बालकामगार :-** १४ वर्षाखालील बालकांना अर्थार्जनासाठी काम करावे लागते. त्यांना 'बालकामगार' असे म्हणतात. भारतासारख्या विकसनशील दिशामध्ये बालमजुरीची समस्या मोठ्या प्रमाणात आढळून येते. भारतात सुमारे १२.६ दशलक्ष बालकामगार आहेत. बालकामगार प्रामुख्याने ग्रामीण भागात (९३%) व त्यातही प्रामुख्याने शेती व्यवसायाशी संबंधीत (६०%) प्रक्रियांमध्ये गुंतलेले आढळून येतात.

**कारणे :-** दारिद्र्य, मोठी लोकसंख्या, बेरोजगारी, शिक्षणाबद्दल अनास्था इ. बालमजुरीची समस्या संपविण्यासाठी विविध कायदे केले आहेत. यामध्ये प्रामुख्याने सन १९४८ चा 'कारखाना कायदा' व सन १९८६ चा 'बालमजूरी प्रतिबंधक कायदा' यांचा उल्लेख करता येईल. यानुसार १४ वर्षाखालील मुलांना धोकादायक काम करायला लावणे बंदी आहे.

८६ व्या घटना दुरुस्ती नुसार ६-१४ वयोगटातील सर्व बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याकरिता शिक्षण हक्क कायदा सन २००९ करण्यात आला आहे. बालकामगारांचा प्रश्न हा अत्यंत महत्वाचा आहे. आजची बालके ही उद्याचा सक्षम भारत आहे. खेळण्या बागडण्याच्या वयात आर्थिक परिस्थितीमुळे मिळेल त्या ठिकाणी दुकाने, हॉटेल, सिनेमागृह, छोटे उद्योग इ. ठिकाणी काम करताना दिसतात. बालकामगारांची नेमंणूक केल्यास कायद्यातील कलम ३ नुसार कमीत कमी तीन महिने तुरूंगवास व जास्तीत जास्त एक वर्षापर्यंत तुगरूंगवास आणि १०,००० रुपये दंड आकारला जातो.

बालमजूरी ही राष्ट्रीय विकासाच्या आड येणारी आहे. याचा आपण गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे.

**२. युवा :-** युवक हे कोणत्याही राष्ट्राचे भविष्य मानले जातात व युवकांचा परिपूर्ण विकास होणे राष्ट्राच्या प्रगतीच्या दृष्टीने आवश्यक असते. कोणत्या वयोगटातील व्यक्तींना युवक समजले जावे याबाबत मतप्रवाह वेगवेगळे दिसून येतात.

उदा. संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या व्याख्येनुसार १५ ते २४ वयोगटातील व्यक्तींना युवा समजले जाते. भारताच्या राष्ट्रीय धोरणानुसार १३ ते २५ वयोगटातील व्यक्तींना युवा समजले जाते.

भारताच्या बाबतीत युवा वर्गाचे महत्त्व अधिक आहे. कारण जगातील इतर देशांच्या मानाने भारतातील युवा वर्गाची संख्या मोठी आहे. सन २०११ च्या जनगणनेसार भारतातील युवा वर्गाची लोकसंख्या सुमारे ६०% इतकी आहे. यामुळे भारताला कार्यरत लोकसंख्येचा 'लोकसंख्याशास्त्रीय लाभांश' मिळालेला आहे.

**युवकांच्या समस्या :-**

**१. बेरोजगारी :-** व्यक्तीला काम करण्याची इच्छा व क्षमता असूनही काम उपलब्ध झाले नाही तर त्या व्यक्तीला बेरोजगार म्हटले जाते.

भारतामध्ये छुपी बेरोजगारी, संरचनात्मक बेरोजगारी, सुशिक्षीत बेरोजगारी घर्षणात्मक बेरोजगारी यासारख्या प्रकारच्या बेरोजगारी आढळतात.

बेरोजगारीमागे भारतातील लोकसंख्येचा 'विस्फोट,' निरक्षरता व्यावसायिक शिक्षणाचा अभाव, शेतीचे अनिश्चित स्वरूप, मंदगतीने होणारे औद्योगिकीकरण यासारखी प्रमुख कारणे आहेत.

बेरोजगारीच्या समस्येमुळे युवा वर्गाच्या विकासावर मर्यादा येतात. तसेच युवाशक्तीचा पुरेसा उपयोग करून घेतला जात नाही. त्याप्रमाणे बेरोजगारीमुळे युवकांमध्ये उदासिनता, गुन्हेगारी यासारख्या इतर समस्या निर्माण होताना दिसतात.

**२. युवकांमधील असंतोष :-** आपल्या देशातील सध्याचे आर्थिक, सामाजिक तसेच राजकीय वातावरण याचा युवकांच्या मनावर परिणाम होवून ते असंतोषाला कारणीभूत ठरत आहे.

सदोष स्वरुपाची शिक्षण व्यवस्था व रोजगारविरहित विकास यामुळे युवकांमध्ये मोठ्या प्रमाणावर असंतोष निर्माण होत आहे.

**३. युवकांमधील व्यसनाधिनता :-** पूर्वी पाश्चात्य देशांमध्ये आढळून येणारी व्यसनाधिनता ही समस्या अलीकडे भारतीय तरूणांच्या बाबतीतही आढळून येते.

युवकांमधील बेरोजगारी, असंतोष व्यसनाधिनतेला कारणीभूत ठरत आहे. त्याचबरोबर व्यसनाधिन मित्रांचा सहवास, व्यसनांबाबत अज्ञान, वाढते शहरीकरण, चंगळवाद हे देखील व्यसनाधिनतेला जबाबदार आहेत.

अंमली पदार्थांचा गैरवापर टाळण्यासाठी केंद्र सरकारद्वारे १९८५ साली नार्कोटिक ड्रग्ज आणि सायकोट्रॉपीक पदार्थ अधिनियम पारीत करण्यात आला.

युवाविकासासाठी **शासकीय धोरण - योजना व कार्यक्रम :-**

**राष्ट्रीय युवा धोरण :-** भारत सरकारद्वारा सर्वप्रथम सन १९८८ साली राष्ट्रीय युवा धोरण तयार करण्यात आले. त्यानंतर युवकांच्या बदलत्या गरजा लक्षात घेता सन २००३ साली नवीन राष्ट्रीय युवा धोरण जाहीर करण्यात आले. या धोरणामध्ये (१) युवा सबलीकरण, (२) लिंगविषयक न्याय, (३) आंतरक्षेत्रीय दृष्टीकोन, (४) माहिती व संशोधन व्यवस्था या क्षेत्रामध्ये युवक विकासासाठी भर देण्यात आला.

**राष्ट्रीय युवा धोरण सन २०११ :-**

केंद्र सरकारने सन २००३ च्या युवा धोरणाचे परीक्षण करून त्यात आवश्यक ते बदल करण्याच्या अनुषंगाने नवीन राष्ट्रीय युवा धोरणाचा मसूदा तयार केला आहे. नवीन मसूदा धोरणामध्ये युवकांसाठी रोजगार, शिक्षण, आरोग्य, लिंगसमनता, सामाजिक न्याय, राष्ट्रीय एकात्मता व मूल्य संवर्धन तसेच पर्यावरण संवर्धन यासारख्या दहा क्षेत्रावर भर देण्यात आला आहे.

**युवा विकासाच्या योजना / कार्यक्रम :-**

**१. राष्ट्रीय युवा व किशोर विकास कार्यक्रम :-** एप्रिल २००८ मध्ये सुरु केलेल्या या योजनेचा युवकांमध्ये नेतृत्व गुण विकसीत करणे व त्यांचा सर्वांगीण व्यक्तिमत्व विकास साध्य करणे हा मुख्य उद्देश आहे. या योजनेअंतर्गत नेहरू युवा केंद्र, राष्ट्रीय सेवा योजना, भारत स्काऊट गाईड इ. संघटनांशी संलग्न असलेल्या युवकांना लाभ दिला जातो.

**२. राष्ट्रीय सेवा योजना :-** या योजनेची सुरुवात सन १९६९ साली करण्यात आली. युवकांमध्ये सामाजिक कार्याद्वारे राष्ट्रीय भावना विकसित करणे व युवकांचा व्यक्तिमत्व विकास साध्य करणे हे या योजनेचे महत्वाचे उद्दिष्ट आहे.

**३. नेहरू युवा केंद्र :-** युवा व क्रिडा मंत्रालयामार्फत देशभरात सन १९७२ साली नेहरू युवा केंद्राची स्थापना करण्यात आली. युवकांच्या व्यक्तिमत्व व कौशल्यांचा विकास करण्याबरोबरच राष्ट्रनिर्मितीच्या कार्यात त्यांच्या सहभाग घेणे हे या कार्यक्रमाचे महत्वाचे उद्दिष्ट आहे.

**४. राष्ट्रीय युवा दल योजना :-** सन २०१०-११ पासून सुरु करण्यात आलेल्या युवा योजनेमध्ये स्वयंसेवक योजना व राष्ट्रीय सद्भावना योजना समाविष्ट आहेत. तरूणांद्वारे समाज विकासाची विविध कामे मार्गी लावण्याचे नियोजन करता येते.

**५. युवकांकरिता वस्तीगृह योजना :-** ही वस्तीगृहे प्रामुख्याने पर्यटन केंद्रे, ऐतिहासिक व सांस्कृतिक महत्वाची ठिकाणे शैक्षणिक केंद्रे इ. ठिकाणी स्थापना केलेली आहेत. सध्या देशाच्या विविध भागामध्ये मिळून सुमारे ८० वस्तीगृहे असून नवीन वस्तीगृहाचे बांधकाम सुरू आहे.

**६. स्काऊट व गाईड योजना :-** भारतामध्ये बिडेन पॉवेल यांच्या पुढाकाराने स्थापन झालेल्या भारत स्काऊट्स व गाईड्स या संघटनेमार्फत युवकांना स्वयंशिस्तीचे प्रशिक्षण दिले जाते.

**राजीव गांधी राष्ट्रीय युवक विकास संस्था :-**

युवक विकासाकरिता राष्ट्रीय पातळीवरील नोडल संस्था म्हणून सन १९९३ मध्ये राजीव गांधी राष्ट्रीय युवक विकास संस्थेची स्थापना करण्यात आली. युवा विकासाच्या क्षेत्रात संशोधन, प्रशिक्षण माहिती प्रसारण, सल्लासेवा व प्रकाशनाचे काम या संस्थेमध्ये केले जाते. राष्ट्रीय एकात्मता व समाज विकासाकरिता युवकांना दिशा देण्याचे काम या संस्थेवर सोपविलेले आहे.

**३. वृध्द :-**

सर्वसाधारणपणे ६० वर्षापेक्षा अधिक वय असलेल्या व्यक्तींना वृध्द समजले जाते. आपल्या देशातील वृध्दांचे प्रमाण लक्षणीय आहे. २०११ च्या लोकसंख्येनुसार सुमारे ८% व्यक्ती वयोवृध्द आहेत व चांगल्या आरोग्य सुविधा तसेच जीवनाचा दर्जा यामुळे वृध्दांची संख्या भावी काळात वाढतच जाणार आहे. सध्या भारतातील सरासरी अपेक्षित आयुर्मान ६५ वर्षे आहे. जे दिवसेंदिवस वाढतच जाणार आहे.

**वृध्दांच्या समस्या :-**

**१. शारीरिक समस्या :-** वय वाढण्याच्या नैसर्गिक प्रक्रियेचा त्यांच्या शरीरावर परिणाम होतो. त्यामुळे अवयवांची कार्यशक्ती क्षीण होणे, केस पांढरे होणे, अनेक गंभीर आजार निर्माण होणे यांसारख्या समस्या निर्माण होतात.

**२. मानसिक समस्या :-** मानसिक वैफल्य, एकाकीपणा, न्यूनगंड, अशा भावना वृध्दांमध्ये निर्माण होऊ शकतात. शारीरिक व मानसिक आधाराचा अभाव असलेल्या वृध्दांमध्ये या समस्या दिसतात.

**३. आर्थिक समस्या :-** भारतासारख्या देशामध्ये अनेक व्यक्ती असंघटीत क्षेत्रामध्ये कार्यरत असतात. अशा व्यक्तींना वृध्दपकाळात कोणतेही आर्थिक लाभ मिळत नाहीत व सामाजिक सुरक्षा योजनांचा देखील अभाव असतो.

**४. सामाजिक समस्या :-** आधुनिक काळात वाढलेला भौतिकवाद व व्यक्तिवाद तसेच कुटूंब पध्दतीचा ऱ्हास यामुळे वृध्दांचा समस्यांकडे पुरेसे लक्ष दिले जात नाही. पिढीतील अंतर व कौटूंबीक वाद निर्माण होतात व त्यातून वृध्दांच्या बाबतीत परावलंबीत्व बेघर होणे, यांसारख्या समस्या निर्माण होतात.

वृध्दांच्या समस्या या केवळ भारतासारख्या विकसनशील देशातच नव्हे तर विकसित देशात सुध्दा आढळतात. या प्रश्नाची दखल युनोने (U.N.O.) घेतली.

राज्य घटनेच्या ४ थ्या भागातील 'कलम ४१' मध्ये म्हटले आहे की, राज्य आपली आर्थिक क्षमता, विकास यांच्या मर्यादेत काम मिळण्याचा हक्क. शिक्षणाचा हक्क आणि म्हातरपण, आजारपण अपंगत्व अशा अवस्थेतील लोकांसाठी सार्वजनिक मदत मिळण्याचा हक्क, हे हक्क नागरीकांना मिळवून देण्यासाठी भारतीय शासनाने वृध्दांसाठी जानेवारी १९९९ मध्ये राष्ट्रीय धोरणाची (National

Policy for older persons) घोषणा केली.

जेणेकरून भारतातील निराधार वृध्दांच्या मानवी हक्कांची पायमल्ली होवू नये.

**संदर्भ ग्रंथ -**


१. भारतीय सामाजिक समस्या - मदन जी.आर.

२. श्रमिकांचे अर्थशास्त्र - प्रभाकर देशमुख

३. योजना मासिक - एप्रिल २०११

४. वृध्दांच्या समस्या चिंता आणि चिंतन - खैरनार दिलीप, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद

५. वृध्दत्व समस्या आणि उपाय - पोतदार शंकरराव, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

६. समाधानी वार्धक्य - शरदचंद्र गोखले, उत्कर्ष प्रकाशन, पुणे

७. मानवी हक्क - पाटील व्ही.बी., के. सागर पब्लीकेशन्स, पुणे

८. मानवी हक्क आयोग - अरूण देशमुख, मनोरमा प्रकाशन, मुंबई

९ मानवी हक्क व कायदे - डॉ. निलेश श्रीराम पालवे.


❑❑❑

**25**

# मानवी हक्क आणि महिला


**प्रा.डॉ. गित्ते आशा नरसिंगराव**
लोकप्रशासन विभागप्रमुख
म.ज्यो.फुले महाविद्यालय, मुखेड


**********

जन्मजात प्रत्येक व्यक्ती हा स्वतंत्र असतो. जन्मताःच प्रत्येक व्यक्तीला काही नैसर्गिक हक्क प्राप्त होतात. अर्थातच प्रत्येक व्यक्तीला नैसर्गिकरित्या आपल्या व्यक्तीमत्वाचा सर्वांगीण विकास करण्याचा आणि स्वातंत्र्य उपभोगण्याचा हक्क आहे. परंतु समाजाने निर्माण केलेल्या कृत्रिम असमानतेमुळे कालांतराने व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर बंधने आली. मानवाच्या हक्काची मुळ संकल्पना आपणास विविध संस्कृती, समुहात व धर्माच्या तत्त्वज्ञानात आढळते.इतिहासात मानवी हक्काविषयीचा सर्वात जुना संदर्भ इ.स.पुर्व २३५० सालातील (लगाश) मधील उरुकागिना येथील सुधारणेबाबत सापडतो. त्यानंतर सुमेरीयन संस्कृतीतील ३२ नमुन्याच्या संहितेत आढळतो. कलिंगच्या युध्दानंतर सम्राट अशोकाने मानवी हक्कांना विशेष प्राधान्य दिले. इस्लाम धर्माच्या उदयानंतर अरबस्थानात मानवी हक्कास महत्त्वाचे स्थान निर्माण झाले. महंम्मद पैगंबरांनी इ.स.६२२ मध्ये मदिनेची सनद तयार केली. मॅग्ना कार्टा नावाची सनद इ.स.१२१५ मध्ये इंग्लंडमध्ये जाहिर करण्यात आली. यापुर्वी नैसर्गिक हक्काची संकल्पना सॉक्रेटीस, प्लेटो, ऑरीस्टॉटल यांच्या विचारात दिसून येते.

दुसऱ्या महायुध्दानंतरच्या काळात अनेक लोकशाहीवादी राष्ट्रे उदयाला आली. स्त्री स्वातंत्र्य, स्त्री हक्क, स्त्री शिक्षण, स्त्री सबलीकरण हा विचार जागतिक पातळीवर गांभीर्याने होण्यास सुरुवात झाली. संयुक्त राष्ट्रसंघाच्या सनदेत स्त्रीयांच्या हक्कांचा स्पष्ट शब्दात उल्लेख करण्यात आला. संयुक्त राष्ट्रसंघाच्या सनदेच्या पहिल्या कलमात असे म्हटले आहे की, वंश, लिंग, भाषा किंवा धर्म या आधारावर कोणताही भेदभाव केला जाणार नाही. संयुक्त राष्ट्रसंघाच्या सनदेतील अनेक कलमात स्त्रीयांच्या हक्काच्या रक्षणासाठी प्रयत्नशील राहण्याचे अभिवचन देण्यात आले आहे. भारतीय संविधानातही स्त्रीयांना कोणताही भेद न करता त्यांना विकासाची समान संधी देण्यात यावी. हक्काच्या विशेष अश्या कायद्याची तरतुद १९५२ मध्ये करण्यात आली. स्त्रीयांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी आणि त्यांच्या समस्या दूर करण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाने १९४६ मध्ये महिला आयोगाची स्थापना केली. महिला आयोगाचे कार्य महत्त्वपूर्ण असेच आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेने १९५२ मध्ये महिलांच्या राजकीय हक्कांचा ठराव संमत केला. सोबतच १९५७ मध्ये विवाहित महिलांच्या

Sawant K.D.
Lecturer in History
Mahila College, Georai.